ॐ

# अध्याय सोळावा

१ श्रीकृष्ण म्हणे, ‘‘गुण हे जाणें तयाचे चि सव्वीस
आला नर जो इथे जोडुनी दैवी संपत्तीस १

होतां पार्था, अशी भावना दश-दिशांत पर-तत्त्व
भव-भय-अंतीं जें अद्वैतीं निपजे तें ‘अभयत्व’ २

सत्स्वरूप तें रुचलें म्हणुनी तिथे रंगली बुद्धि
तेणें अंतःशुद्धि जाहली ती चि ‘सत्त्व-संशुद्धि’ ३

आत्मप्राप्तिस्तव जी ज्ञानीं तैसी योगीं निष्ठा
तो कपि-ध्वजा, प्रमुख गुण तिजा जाणें पुरुष-श्रेष्ठा ४

तन-मन-जीवें धनें वैभवें श्रांत आर्त जीवातें
अहेतुकपणें साह्य अर्पिणें जाण ‘दान’ तें निरुतें ५

सर्व इंद्रियें स्ववश ठेवणें त्यातें ‘दम’ हें नांव
निज-कर्तव्याचरण पांडवा, ‘यज्ञ’ चि तो स्वयमेव ६

तत्त्व-दर्शनास्तव धनंजया, करणें वेदाध्ययन
स्तोत्र-पाठ वा नाम-जप, तया 'स्वाध्याय' असें जाण ७

देह दंडणें क्लेश साहणें सत्य-दर्शनासाठीं
'तप' नाम तया, 'आर्जव' विजया, सौजन्यातें म्हणती ८

२ काया-वाचा-मनें साधणें सदा विश्व-कल्याण
जाण भारता, असे तत्त्वतां ती चि 'अहिंसा' पूर्ण ९

खुपे न कवणा न च अधिक-उणा शब्द नित्य हित-कारी
प्रिय भाषण जें यथार्थ सहजें तें चि 'सत्य' अवधारीं १०

वचें डिवचिला अथवा केला जरी कुणी प्रतिरोध
तरी अंतरीं क्षुब्ध न होणें तया नांव 'अक्रोध' ११

आशा ममता तशी अहंता सोडुनियां संसारीं
लिप्त न होणें विरक्त असणें 'त्याग' तो चि निर्धारीं १२

ज्ञेयीं पडतां मिठी भारता, हरपे ज्ञाता ज्ञान
विश्वपण विरे मग उरे तया परम 'शांति' अभिधान १३

वर्म काढणें न च हीनपणें कधीं चहाडी करुनी
परंतु पडता नर सांवरणें तें चि 'अपैशुन' मानीं १४

बुडता कोणी दुःख-सागरीं कळवळुनी निज-चित्तीं
हात देउनी तया काढणें वरतीं 'भूत-दया' ती १५

भोग-सुखें तीं उभीं चि पुढतीं हात जोडुनी असतां
न च लोलुपता तिथे सर्वथा 'अलोलुपत्व' तें पार्था १६

धरुनी चित्ती सर्वां भूतीं स्नेह-भाव अनिवार
जीवें-भावें परार्थ झटणें तें ‘मार्दव’ साचार १७

जन्मुनि साचें नर-देहाचें न च होतां सार्थक तें
लाजिरवाणें जिणें वाटणें ‘ह्री’ हे नांव तयातें १८

मन-पवन-जयें सर्व इंद्रियें स्व-वश होउनी चित्ता
स्थिरता येणें तें तूं जाणें ‘अचापल’ असें पार्था १९

३ विधि-निषेध जें न गणी जेथें न च महत्त्व ऋद्धीचें
पर-तत्त्वीं जें धांवे सहजें तें चि ‘तेज’ आत्म्याचें २०

असतां सत्ता त्यजुनि अहंता विश्वाचे गुण-दोष
सर्व साहणें गंभीरपणें ‘क्षमा’ ती अनाक्रोश २१

छळावतातें त्रि-विध ताप ते उभे ठाकतां पुढतीं
धीर-वृत्तिनें चित्त ठेवणें स्थिर त्याते ‘धृति’ म्हणती २२

ज्ञानें अंतःकरण शोधणें कर्मांनें बाह्यांग
एवं अंतर्बाह्य शुद्धता जाण ‘शौच’ तें साङ्ग २३

शिवे न च मना द्वेष-भावना सर्वां भूतीं स्नेह
पर-हित करुनी स्व-हित साधणें तो चि जाण ‘अद्रोह’ २४

मान-मान्यता जगीं पावतां निरभिमानता धरणें
अशी नम्रता ती चि तत्त्वतां ‘नातिमानिता’ जाणें २५

अशी वर्णिली अर्जुना, भली ही ‘दैवी संपत्ति’
जयें जोडिली तया स्वभावें लाभे शाश्वत शांति ! २६

आला नर जो इथे आसुरी संपत्ती जोडून
ऐक भारता, अतां तयाची खूण चित्त देऊन २७

४ दंभ वल्गना क्रोध मीपणा कठोरता अज्ञान
त्याच्या ठायीं वसती साही दोष असे हे जाण २८

५ बंध घालते आसुरी तशी दैवी सुटका करिते
तुज खेद नको जोडुनि दैवी जन्मलासि तूं येथें २९

६ येथें दैवी आणि आसुरी दोन्ही सृष्टी पार्था
कथिली दैवी सविस्तर तशी ऐक आसुरी आतां ३०

७ आसुर जन ते नेणती इथे सहजें कृत्याकृत्य
न जाणती ते आचार तथा न च पवित्रता सत्य ३१

८ आणि बोलती ते मंद-मती स्वीकारुनि पाखांड
'जग हें लटिकें क्षण हि न च टिके देव-धर्म थोतांड ! ३२
जगांत कुठला ईश्वर आला निराधार हें सारें
नसे चि ह्यातें कारण कोणी कामावांचुनि दुसरें ३३
स्वभावतां ती भूतोत्पत्ती नर-मादी-संयोगें
सुखोपभोगीं न च उपयोगी पुण्य-पाप हीं ढोंगें ३४
खावें प्यावें यत्न करावे सुखोपभोगासाठीं
होतां अंतीं तनुची माती कांहीं न उरे पाठीं !' ३५

९ अशी चि उलटी ठेवुनि दृष्टी नष्टात्मे मूढ-मती
हिंसक रिपु ते जन्मले इथे जगद्विनाशासाठीं ३६

१० न च उपभोगें घटे न च हटे दुर्भर ऐसा काम
रमती तेथें विमूढ-चित्तें मानुनि तें निज-धाम ३७

असे बुडाले काम-सागरीं दंभ-मान-मद-युक्त
दुराग्रह-बळें मूढ जाहले पापाचरणीं निरत ३८

११ अपार चिंता-भार वाहती सरे न जो जन्मान्तीं
विषयासक्ती ती परम गती अशी निश्चिती धरिती ३९

आणि धांवती भोग-सुखें तीं मिळवायातें येथें
किती मिळालीं तरी कामना-पूर्ती न च ती होते ४०

१२ सुखाभिलाषा म्हणुनी आशा-पाश-शतांनीं बद्ध
भोगीं विघ्नें येतां होती कामी-जन ते क्रुद्ध ४१

मग अपेक्षिती धन-संपत्ती अन्यायें मिळवाया
दूर सारिती विघ्नें, झटती भोग-सुखें साधाया ४२

१३ 'आज मिळविलें मी हे सगळें साधीन मनोगत जें
तें हि धन तसें होइल माझें हें तों आहे सहजें ४३

१४ आतां पहिला हा चि मारिला वधीन हि दुजे वैरी
बल-शाली मी सुखी सिद्ध मी भोक्ता सत्ताधारी ४४

सृष्टीवरतीं माझी सत्ता असतां ईश्वर कुठला
आला दुसरा ? काळ थरथरां कांपे पाहुनि मजला ४५

१५ असें त्रि-भुवनीं कुबेराहुनी मी चि सधन संपन्न
अन्य न च कुणी गुणी मजहुनी मी चि जगांत कुलीन ४६

दान-शुर मी गायक नामी नट-नर्तक जमवोनी
द्रव्य तयांतें देइन मातें रंजविती जे कोणी ४७
रिपु जिंकाया जारण-मारण करीन मोठे यज्ञ
हर्ष विलासीं मानीन' असे मूढ जल्पती अज्ञ ४८
१६ रचिती नाना मनःकामना म्हणुनी होती भ्रांत
विषयीं रमती गुंतुनि जाती असे मोह-जालांत ४९
भयाण रात्रीं भुतें व्यापिती स्मशान-भूमी सारी
तशीं तयांतें महा-पातकें घेरिती चि संसारीं ५०
विषयासक्तां सुख न सर्वथा यातना तयां अधिक
जिवंत असतां घडे भोगणें घोर अमंगळ नरक ५१
१७ ते अल्प-मती स्वयें महंती आपुली चि वाढविती
गर्वें फुगती क्षुद्र लेखिती तृणाहूनि ही जगती ५२
धन-मान-मदें मत्त होउनी नाममात्र यज्ञातें
ते आचरिती दांभिक-वृत्ती ठेवुनि विधितें परतें ५३
१८ अहंकार-बळ-दर्पें भरले काम-क्रोधें निरुते
म्हणुनि निंदिती देखतां सती-संत-यती-भक्तांतें ५४
अपुल्या देहीं सर्वां ठायीं न देखती ते मातें
परमेशातें म्हणुनी येथें वाढविती द्वेषातें ५५
१९ मला द्वेषिती असे दुर्मती नराधम अमंगळ ते
ह्या संसारीं टाकिं आसुरी योनींत सदा त्यांतें ५६

२० जन्मोजन्मीं अशी आसुरी योनि जोडुनी अंतीं
मज न पावतां ते मूढ-मती अधोगतीतें जाती ! ५७

२१ पाहें काम-क्रोध-लोभ हें नरक-द्वार तिहेरी
आत्म-नाश तें करी म्हणुनियां त्वां सारावें दूरी ५८

असे जोंवरी दिलें अंतरीं काम-क्रोधें ठाण
जाण तोंवरी ह्या संसारीं नसे आत्म-कल्याण ५९

२२ निघे अशीं हीं टाळुनी तिन्ही अज्ञान-तमोद्वारें
कल्याण-पथें नर तो येथें नव्हे बद्ध संसारें ६०

मग चोखळितां सच्छास्त्र-पथा प्रबळ असा सत्संग
मिळे तयातें गुरु-कृपा-बळें आत्मानंद अभंग ६१

२३ विषय-विलासामाजीं चि पिसा होउनि जो साचार
शास्त्र-विधीतें त्यजुनी येथें करितो स्वैराचार ६२

न च कल्पान्तीं ती परम गती तया लाभते जाण
सुख हि न च मिळे मग तें कुठलें तया ब्रह्म-निर्वाण ! ६३

२४ म्हणुनी शास्त्र प्रमाण मानीं कार्याकार्यीं येथें
शास्त्र-विधीतें जाणुनि कर्में करणें समुचित तूतें.'' ६४

येथें भावार्थ गीतेंत अध्यायीं षोडशीं अशी ।
ही दैवासुर-संपत्ति विभागूनि निवेदिली ॥ १६ ॥